**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी - चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३.

जा.क्र पोउआ/वाहतूक/उपक्रम/ ई- /२०२४ पिंपरी-चिंचवड दिनांक /१२/२०२४

# प्रेसनोट

## वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड

मा. पोलीस आयुक्त, कार्यालय पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रातील वाहतूक शाखेचे विभागामध्ये महिन्याचे पहिल्या आणि तिसऱ्या गुरूवारी "एक दिवस शाळेसाठी" हा उपक्रम राबविण्यात येतो. या उपक्रमांतर्गत वाहतूक शाखेच्या एकुण १५ टिमच्या माध्यमातुन दर गुरूवारी १५ शाळांमध्ये जावुन विद्यार्थ्यांमध्ये रस्ते सुरक्षा, वाहतूक नियमन, अपघात विषयी माहिती, व्यसनाधिनतेपासुन दुर राहणे, सायबर गुन्हेगारी, सोशल मिडियाचा वापर इत्यादी मुद्यांवर मार्गदर्शन करण्यात येते.

आज दि.१९/१२/२०२४ रोजी वाहतूक शाखेमार्फत सतराव्या टप्प्यात एकुण १५ टिमचे माध्यमातुन, निवडलेल्या १५ शाळांमधुन सुमारे **४१४५** विद्यार्थ्यांपर्यंत पोहचुन त्यांना पीपीटीद्वारे मुद्देसूद मार्गदर्शन केले. "एक दिवस शाळेसाठी" या उपक्रमाअंतर्गत आतापर्यंत एकुण १७ टप्प्यामध्ये **७३७६१** विद्यार्थांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी जबाबदार नागरिक व चांगला माणुस बनावे या दृष्टीकोनातून पिंपरी चिंचवड वाहतूक विभागामार्फत या प्रबोधनपर उपक्रमाचे यशस्वी नियोजन करण्यात आले आहे.

वरील उपक्रम मा. श्री. विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. शशिकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. बापू बांगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड यांचे संकल्पनेतून श्री. अनिल कोळी, सहायक पोलीस आयुक्त-१ वाहतूक शाखा, श्री. सतीश कसबे, सहायक पोलीस आयुक्त-२, वाहतूक शाखा तसेच वाहतूक शाखेचे सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मार्फतीने आज दि.१९/१२/२०२४ रोजी यशस्वीरित्या पार पडला. उत्फुर्त प्रतिसाद मिळणाऱ्या या विद्यार्थीभिमुख उपक्रमाचा पुढील टप्पा गुरुवार, दिनांक- ०२ जानेवारी २०२५ रोजी पार पडणार आहे.

( बापू बांगर )
पोलीस उप - आयुक्त
वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड

प्रत :- १) पोलीस निरीक्षक प्रेसरूम पोलीस आयुक्त, कार्यालय, पिंपरी चिंचवड
२) सर्व संपादक/ वार्ताहर, सर्व लोकप्रिय वृत्तपत्रे.